नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता (PoCRA) नवीन ७८२ पदांच्या निर्मितीस मंजूरी प्रदान करणे तसेच, प्रकल्पाकरिता एकूण ८०५ पदांचा आकृतीबंध मंजूर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

शासन निर्णय क्रमांक :- हअप्र-०७१६/प्र. क्र.८०/राकृवियो कक्ष,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ सप्टेंबर, २०१७.

**वाचा :**

१. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांकः- हअप्र-०७१६/प्र. क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.७/०७/२०१६
२. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांकः- हअप्र-०७१६/प्र. क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.१०/०८/२०१६
३. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांकः- हअप्र-०७१६ /प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष, दि.१७/०१/२०१७
४. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचा प्रस्ताव क्र. हअकृप/ प्र.क्र.३७/प्रशा, दि. ०३ मे, २०१७
५. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांचे पत्र क्र.नादेकृसंप्र/आस्था/१४०/२०१७, दि. ११ सप्टेंबर, २०१७

**प्रस्तावनाः-**

विदर्भ व मराठवाडयातील सुमारे ४००० दुष्काळग्रस्त गावांमध्ये तसेच विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील सुमारे ९०० गावांमध्ये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने रू. ४००० कोटी अंदाजित खर्चाचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पूर्वीचे नांव हवामान अनुकूल कृषि प्रकल्प) राबविण्यास संदर्भाधिन दि. ७ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, संदर्भाधिन शासन निर्णय दि.१० ऑगस्ट, २०१६ अन्वये प्रकल्प मंजूरीपूर्व कामांकरिता प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (Project Management Unit) मुंबई येथे स्थापना करण्यास व या कार्यालयाकरिता २३ पदांच्या निर्मितीस मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत, प्रकल्पांतर्गत १५ जिल्हयांमधील ५१४२ गावांची प्रकल्प अंमलबजावणीसाठी निवड करण्यात आलेली आहे तसेच, जागतिक बँकेच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने प्रकल्प अंमलबजावणी आराखडा व विविध कार्यप्रणाली पुस्तिकांचा मसूदा तयार केला असून त्यास लवकरच जागतिक बँकेची मान्यता अपेक्षित आहे. प्रकल्पाची जिल्हा स्तर, उप विभाग स्तर व गाव समूह स्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु करण्यापूर्वी प्रकल्पास लागणाऱ्या मनुष्यबळाच्या दृष्टीने आवश्यक

पदांची निर्मिती करणे गरजेचे आहे. त्यानुषंगाने, प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, यांनी प्रकल्पाकरिता एकूण ८०५ पदांच्या निर्मीतीचा प्रस्ताव (नवीन ७८२ पदे + पूर्वीची मंजूर २३ पदे) शासन मंजूरीस्तव सादर केला होता. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीची सदर नवीन ७८२ पद निर्मीतीच्या प्रस्तावास चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे तसेच, दि.१९ सप्टेंबर, २०१७ रोजी उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीत सदर प्रस्ताव समितीच्या कार्योत्तर मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता नवीन मंजूर ७८२ पदे आणि यापूर्वी मंजूर केलेल्या एकूण २३ पदांसह एकूण ८०५ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्याबाबत शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता पुढीलप्रमाणे नवीन ७८२ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | पदनाम व कंसात पदाचा संवर्ग आणि संबंधित प्रशासकीय विभागांच्या संवर्ग पदांमधून नियुक्ती / प्रतिनियुक्ती अथवा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत तपशिल | वेतनश्रेणी/ ठोक वेतन | दि.१०.८.१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर पदे | नवीन मंजूर करण्यात येत असलेली पदे | नवीन मंजूर ७८२ पदांपैकी प्रथम टप्प्या करिता नियुक्त करावयाची पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नियुक्ती / प्रतिनियुक्ती | कंत्राटी पध्दतीने |
| **(अ)** | **प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई** | | | | | |
| १ | प्रकल्प संचालक (भा.प्र.से. संवर्गातील सचिव दर्जाचे पद ) | पी.बी.-४- रु. ३७४००-६७००० ग्रे.पे. १०००० | १ | -- | -- | -- |
| २ | प्रकल्प उप संचालक (कृषि व पदुम विभाग, मंत्रालयातील अवर सचिव संवर्गाचे पद) | पी.बी.-३- रु. १५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १ | -- | -- | -- |
| ३ | सहाय्यक प्रकल्प संचालक (कृषि व पदुम विभाग, मंत्रालयातील कक्ष अधिकारी संवर्गाचे पद) | पी.बी.३-रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ५४०० | १ | -- | -- | -- |
| ४ | *कृषि विद्यावेत्ता (महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील पद) | पी.बी.-३- रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १ | -- | -- | -- |
| ५ | *मृदा विज्ञान विशेषज्ज्ञ (महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील पद) | पी.बी.-३- रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १ | -- | -- | -- |
| ६ | * कृषि अभियंता (महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गातील पद) | पी.बी.-३- रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १ | -- | -- | -- |

| अ. क्र. | पदनाम व कंसात पदाचा संवर्ग आणि संबंधित प्रशासकीय विभागांच्या संवर्ग पदांमधून नियुक्ती / प्रतिनियुक्ती अथवा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत तपशिल | वेतनश्रेणी/ ठोक वेतन | दि.१०.८.१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर पदे | नवीन मंजूर करण्यात येत असलेली पदे | नवीन मंजूर ७८२ पदांपैकी प्रथम टप्प्या करिता नियुक्त करावयाची पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नियुक्ती / प्रतिनियुक्ती | कंत्राटी पध्दतीने |
| ७ | *हायड्रोलॉजिस्ट/ जिओलॉजिस्ट (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संवर्ग) (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-३-रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १ | -- | -- | -- |
| ८ | * वित्त विशेषज्ञ (उप संचालक,महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-३-रु.१५६००-३९१०० ग्रे.पे. ६६०० | १ | -- | -- | -- |
| ९ | * तंत्र अधिकारी (महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब संवर्गातील पद) | पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४६०० | -- | ९ | ५ | -- |
| १० | लेखा अधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) (प्रतिनियुक्ती) | *पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४६०० | -- | १ | १ | -- |
| ११ | सहा. लेखाधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) (प्रतिनियुक्ती) | * पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४४०० | १ | १ | -- | -- |
| १२ | लघुलेखक (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४४०० | २ | -- | -- | -- |
| १३ | *सहाय्यक / सहायक कक्ष अधिकारी (कृषि व पदुम विभाग, मंत्रालय संवर्ग) | पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे.४३०० | ४ | २ | -- | -- |
| १४ | लेखापाल /रोखपाल (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४२०० | १ | -- | -- | -- |
| १५ | उप-लेखापाल (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | -- | ३ | २ | -- |
| १६ | लेखा लिपिक (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-१-रु.५२००-२०२०० ग्रे.पे.१९०० | -- | ६ | ३ | -- |
| १७ | लिपिक-टंकलेखक (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-१-रु.५२००-२०२०० ग्रे.पे.१९०० | -- | ६ | ३ | -- |
| १८ | प्रापण तज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु. १, ५०,०००/- पर्यंत ठोक वेतन | १ | -- | -- | -- |
| १९ | संनियंत्रण व मुल्यमापन तज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु. १,५०,०००/- पर्यंत ठोक वेतन | १ | -- | -- | -- |
| २० | समाजशास्त्र तज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु. १,५०,०००/- पर्यंत ठोक वेतन | १ | -- | -- | -- |
| २१ | कृषि व्यवसाय विशेषज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु. १,५०,०००/- पर्यंत ठोक वेतन | १ | -- | -- | -- |

| अ. क्र. | पदनाम व कंसात पदाचा संवर्ग आणि संबंधित प्रशासकीय विभागांच्या संवर्ग पदांमधून नियुक्ती / प्रतिनियुक्ती अथवा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत तपशिल | वेतनश्रेणी/ ठोक वेतन | दि.१०.८.१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर पदे | नवीन मंजूर करण्यात येत असलेली पदे | नवीन मंजूर ७८२ पदांपैकी प्रथम टप्प्या करिता नियुक्त करावयाची पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नियुक्ती / प्रतिनियुक्ती | कंत्राटी पध्दतीने |
| २२ | जीआयएस विशेषज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु. १,५०,०००/- पर्यंत ठोक वेतन | १ | -- | -- | -- |
| २३ | पर्यावरण विशेषज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु.१,००,०००/- पर्यंत ठोक वेतन | -- | १ | -- | १ |
| २४ | संवाद विशेषज्ज्ञ (कंत्राटी पध्दतीने) | रु.१,००,०००/- पर्यंत ठोक वेतन | -- | १ | -- | १ |
| २५ | सहाय्यक (कंत्राटी पध्दतीने) | रु.४०,००० /- पर्यंत ठोक वेतन | -- | १२ | -- | ४ |
| २६ | शिपाई/ मेसेंजर (कंत्राटी पध्दतीने) | रु.२५,००० /- पर्यंत ठोक वेतन | २ | ६ | -- | २ |
| **एकूण अ - (प्रकल्प व्यवस्थापन कक्ष)** | | | **२३** | **४८** | **१४** | **८** |
| **(ब)** | **जिल्हा स्तर (एकूण १५ जिल्हे)** | | | | | |
| १ | प्रकल्प विशेषज्ज्ञ- कृषि (महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब (कनिष्ठ) संवर्गातील पद) | पी.बी.-२-रु. ९३००-३४८०० ग्रे.पे. ४४०० | -- | १५ | १५ | -- |
| २ | प्रकल्प विशेषज्ज्ञ - प्रापण | रु.३५००० /- पर्यंत ठोक वेतन | -- | १५ | -- | -- |
| ३ | प्रकल्प विशेषज्ज्ञ - कृषि व्यवसाय | रु.३५००० /- पर्यंत ठोक वेतन | -- | १५ | -- | १५ |
| ४ | प्रकल्प विशेषज्ज्ञ- मनुष्यबळ विकास | रु.३५००० /- पर्यंत ठोक वेतन | -- | १५ | -- | १५ |
| ५ | प्रकल्प लेखा सहाय्यक | रु. २५००० /- पर्यंत ठोक वेतन | -- | ३० | -- | १५ |
| **एकूण ब - (जिल्हा स्तर)** | | | -- | **९०** | **१५** | **४५** |
| **(क)** | **उप विभाग स्तर (एकूण ३६ उप विभाग)** | | | | | |
| १ | लेखाधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) (प्रतिनियुक्ती) | पी.बी.-२-रु.९३००-३४८०० ग्रे.पे. ४६०० | -- | ३६ | ३६ | -- |
| २ | प्रकल्प सहाय्यक (महाराष्ट्र कृषि सेवेतील कृषि पर्यवेक्षक संवर्गातील पद) | पी.बी.-२-रु.५२००-२०२०० ग्रे.पे. ४२०० | -- | ३६ | ३६ | -- |
| ३ | प्रकल्प लेखा सहाय्यक | रु.१५००० (मानधन) | -- | ७२ | -- | ३६ |
| **एकूण क- (उप विभाग स्तर)** | | | -- | **१४४** | **७२** | **३६** |

| अ. क्र. | पदनाम व कंसात पदाचा संवर्ग आणि संबंधित प्रशासकीय विभागांच्या संवर्ग पदांमधून नियुक्ती / प्रतिनियुक्ती अथवा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत तपशिल | वेतनश्रेणी/ ठोक वेतन | दि.१०.८.१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर पदे | नवीन मंजूर करण्यात येत असलेली पदे | नवीन मंजूर ७८२ पदांपैकी प्रथम टप्प्या करिता नियुक्त करावयाची पदे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नियुक्ती / प्रतिनियुक्ती | कंत्राटी पध्दतीने |
| (ड) | गाव समूह स्तर | | | | | |
| १ | समुह सहाय्यक | रु.१५००० (मानधन) | -- | ५०० | -- | १०० |
| | एकूण ड- (गाव समूह स्तर) | | -- | ५०० | -- | १०० |
| | प्रकल्पाकरिता एकूण मंजूर पदे [(अ)+(ब)+(क)+(ड)] | | २३ | ७८२ | १०१ | १८९ |
| | | | ८०५ | | २९० | |

*(*प्रकल्प अहवाल तातडीने तयार करण्याकरिता संदर्भांकित शासन निर्णय दि.१०/०८/२०१६ मधील सदर पदांवर वरीष्ठ अधिकारी उपलब्ध न झाल्यास त्यापेक्षा कनिष्ठ अधिकाऱ्याच्या नियुक्तीकरिता मुभा ठेवली होती, आता सदर पदांसह प्रकल्पाकरिता मंजूर केलेल्या एकूण ८०५ पदांचा त्या-त्या विभागाच्या आकृतीबंधात प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समाविष्ट करणे शक्य व्हावे म्हणून ही पदे वरिष्ठ संवर्गात समाविष्ट करण्यात येत आहेत.)*

२. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता मंजूर करण्यात येत असलेल्या ७८२ नवीन पदांपैकी प्रथम टप्प्याकरिता २९० पदे भरण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या पुढील टप्प्याकरिता आवश्यक पदे वित्त विभागाच्या मान्यतेने भरण्यास यथावकाश मंजूरी देण्यात येईल.

३. प्रकल्पाकरिता संदर्भांकित शासन निर्णय दि.१०.८.२०१६ अन्वये मंजूर केलेल्या २३ पदांपैकी काही पदे विविध प्रशासकिय विभागातून प्रतिनियुक्तीने भरण्यास मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे, या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या नवीन ७८२ पदांपैकी काही पदे विविध प्रशासकिय विभागांच्या संवर्ग पदांमधून नियुक्ती / प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. सबब, सदर एकूण ८०५ पदांपैकी काही पदांवर संबंधित प्रशासकिय विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, परिच्छेद क्र.१ मधील तक्त्यात संवर्ग पदे म्हणून नमूद केलेली सर्व पदे संबंधित प्रशासकिय विभागांनी त्यांच्या आकृतीबंधात संवर्ग पदे म्हणून प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समाविष्ट करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार, सर्व संबंधित विभागांनी सदर पदांचा त्यांच्या आकृतीबंधात प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात संवर्ग पदे म्हणून समावेश करावा.

४. परिच्छेद क्र. १ मधील तक्त्यात नमूद केल्यानुसार, प्रकल्प व्यवस्थापन कक्षांतर्गत निर्माण करण्यात आलेली अ.क्र. २, ३ व १३ येथील अनुक्रमे अवर सचिव, कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकाऱ्यांची पदे कृषि व पदुम विभाग, मंत्रालयाच्या आकृतीबंधामध्ये संवर्ग पद म्हणून समाविष्ट करण्यात यावीत. त्याचप्रमाणे, अ.क्र. ४, ५ व ६ येथील पदे महाराष्ट्र कृषि सेवेतील अधिक्षक कृषि अधिकारी गट-अ संवर्गातील पदे म्हणून, आणि अ.क्र. ९ येथील पदे महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील पदे म्हणून समाविष्ट करण्यात यावीत. त्यानुसार सदर पदे कृषि विभागाच्या अधिनस्त कृषि आयुक्तालयाच्या आकृतीबंधामध्ये संवर्ग पदे म्हणून प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समाविष्ट करावीत.

५. परिच्छेद क्र. १ मधील तक्त्यात नमूद केल्यानुसार, जिल्हा स्तरावर निर्माण केलेली अ.क्र.१ येथील पदे महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) सवंर्गातील पदे म्हणून तसेच, उप विभाग स्तरावर निर्माण केलेली अ.क्र. २ येथील कृषि पर्यवेक्षक संवर्गाची पदे म्हणून घोषीत करण्यात येत आहेत. त्यानुसार कृषि विभागाच्या अधिनस्त कृषि आयुक्तालयाच्या आकृतीबंधामध्ये सदर पदे संवर्ग पदे म्हणून प्रकल्प कालावधीपर्यंत अस्थायी स्वरुपात समाविष्ट करावीत.

६. प्रथम टप्प्याकरिता एकूण २९० पदांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली असून या पदांपैकी १०१ पदे विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती वा प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. या पदांकरिता संबंधित प्रशासकीय विभागातून संवर्ग पदावरील अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होत नसल्यास, सदर पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची बाहयस्रोत यंत्रणेद्वारे कंत्राटी तत्त्वावर आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

७. त्याचप्रमाणे, प्रकल्प संचालकांना आवश्यकता वाटल्यास, प्रकल्पाकरिता निर्माण केलेल्या वरिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे पद अवनत करुन त्या पदावर संबंधित प्रशासकीय विभागातील लगतच्या वेतन श्रेणीतील कनिष्ठ पदांवरील अधिकारी/कर्मचारी नियुक्त करण्याची देखील मुभा राहिल.

८. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता मंजूर करण्यात आलेली सर्व ८०५ पदे प्रकल्प कालावधीपर्यंत कृषि विभागाच्या आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात निर्माण करण्यात येत असून प्रकल्पाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर पदे आपोआप निरसीत होतील.

९. सदर प्रकल्पांतर्गत बाहयस्रोत यंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर भरण्यात येणारी पदे केवळ प्रकल्प कालावधीपर्यंतच अस्तित्वात राहतील. प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर कंत्राटी तत्वावर नियुक्ती दिलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा देखिल संपुष्टात येतील व कोणत्याही परिस्थितीत त्यांचा शासकीय सेवेत समावेश करण्यात येणार नाही. प्रकल्प संचालकांनी संबंधितांशी करारनामा करतेवेळी याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासनावर कोणतेही दायित्व निर्माण होणार नाही याची दक्षता ध्यावी.

१०.नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता मंजूर करण्यात आलेल्या सर्व ८०५ पदांवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनादी बाबींवरील खर्च प्रकल्पाच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवावा -

मागणी क्र.डी-३,

२४०१- पीक संवर्धन

(११५) लहान / सिमांत शेतकरी व कृषी मजूरांसाठी योजना

(००) (०३) हवामान अनुकूल कृषी प्रकल्प

(राज्य हिस्सा ३० %)

०१ वेतन (२४०१ A६५५)

११.सदर शासन निर्णय उच्चस्तर सचिव समितीने पद निर्मितीस चक्रीय पध्दतीने दिलेल्या मान्यतेनुसार तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४१२/आपुक, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२८१७०३५३५७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.03 15:40:26 +05'30'

**(श्रीकांत चं. आंडगे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन), कृषिव पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
११.प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई.
१३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे,
१४. उप सचिव (आस्था), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
१५. उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई.
१६. विभागीय आयुक्त (औरंगाबाद / नाशिक/ अमरावती / नागपूर विभाग)
१७. जिल्हाधिकारी (सर्व)
१८. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
१९. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२०. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२२. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,

२३. वित्त विभाग (व्यय १ / आपुक ), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

२४. नियोजन विभाग ( कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

२५. कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक - २ अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

२६. निवड नस्ती